**<u>ठळक बातम्या</u>**

- रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी विनारोकड उपचार योजना लवकरच देशभरात लागू करण्याची नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती, महाराष्ट्रात सुरु असलेले ७८ रस्ते प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचं आश्वासन
- राज्यसभेत गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- प्रार्थनास्थळ कायद्याअंतर्गत नवीन खटले दाखल करून न घेण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ च्या सॉफ्टवेअर एडिशनचा समारोप
- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सात माओवादी ठार

  **आणि**
- फिडे बुद्धिबळ स्पर्धेत अटीतटीच्या लढतीत चीनी ग्रँडमास्टर डिंग लिरेनवर मात करत भारताच्या डी. गुकेशची विश्वविजेतेपदाला गवसणी

**<><><><><>**

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या योजनेत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार कॅशलेस पद्धतीनं मिळू शकतील, असं गडकरी म्हणाले.

**होल्ड- बाईट गडकरी**

लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महाराष्ट्रातल्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांसंदर्भात विविध सदस्यांनी प्रश्न विचारले. त्यावर बोलताना, महाराष्ट्रात ७८ प्रकल्प सुरु असून, लवकरात लवकर ते पूर्ण करु, असं आश्वासन गडकरी यांनी दिलं.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी आणि अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस यांच्या बरोबरच्या काँग्रेस नेत्यांच्या संबंधांवर झालेल्या आरोपप्रत्यारोपामुळे राज्यसभेचं कामकाज आज आधी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. दोन वाजता कामकाज सुरु झाल्यानंतर दोन्ही बाजूनं जोरदार घोषणाबाजी सुरु झाली. गोंधळातच कामकाज सुरु ठेवण्याचा प्रयत्न अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या कडून सुरु होता तरीही गोंधळ सुरुच राहिला.

जनता दलाचे खासदार एचडी देवेगौडा यांनी विरोधी पक्षानं दिलेल्या अविश्वास ठरावावर टीका केली. विरोधी पक्षांनी कामकाज सुरु राहण्यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं. राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जन खरगे यांनी राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावर पक्षपातीपणाचा आरोप केला. सत्ताधारी सदस्य काँग्रेसवर विनाकारण आरोप करत असल्याचंही ते म्हणाले. त्यावर राज्यसभेतला गोंधळ अधिक वाढला आणि अखेर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजूजू यांच्या विरोधात तृणमूल काँग्रेसच्या राज्यसभा सदस्य सागरिका घोष यांनी आज राज्यसभेत हक्कभंग ठराव मांडला. त्या म्हणाल्या की, संसदेच अधिवेशन विनाअडथळा चालवण्याची जबाबदारी संसदीय कामकाज मंत्र्यांवर असते. त्याऐवजी त्यांनी विरोधी सदस्यांचा अपमान केला. त्यांची विधानं आक्षेपार्ह असून ती कामकाजातून काढून टाकावीत, आणि रिजूजू यांनी माफी मागावी अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><><>**

प्रार्थनास्थळ कायद्याअंतर्गत नवीन खटले दाखल करून घेतले जाऊ नयेत असा आदेश आज सर्वोच्च न्यायालयानं दिला. तसंच या अंतर्गत प्रलंबित

खटल्याप्रकरणी पुढील आदेशापर्यंत कोणतेही अंतिम आदेश देऊ नयेत, असंही न्यायालयानं सांगितलं आहे. प्रार्थनास्थळ कायदा १९९१ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर चार आठवड्यात उत्तर द्यावं असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालच्या विशेष पीठानं सांगितलं आहे. या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ नंतर कोणत्याही प्रार्थनास्थळामधे बदल करायला मनाई करण्यात आली आहे.

दरम्यान, हा कायदा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावण्याची मागणी करणारी हस्तक्षेप याचिकाही सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

**<><><><><>**

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ च्या सॉफ्टवेअर एडिशनचा आज समारोप होत आहे. मुंबईत हॅकेथॉन चं आयोजन एल एन वेलिंगकर व्यवस्थापन विकास आणि संशोधन संस्थेनं केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, विश्लेषण, प्रतिमा विश्लेषण आणि समस्या या विषयांवरल्या स्पर्धांमध्ये ३४ संघ सहभागी झाले होते. याबाबत केंद्रप्रमुख निलेश लेले यांनी सांगितलं.

**होल्ड--बाईट--लेले**

पुण्यात हॅकेथॉनचं आयोजन एमआयटी कला, डिझाईन आणि तंत्रज्ञान विद्यापीठानं केलं होतं. नागपूरमध्ये जी एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयात हॅकेथॉन आयोजित केलं होतं. त्यात सहभागी झालेल्या AICTE च्या नवोन्मेष विभागाचा प्रादेशिक व्यवस्थापक मयुर बोरकर यानं सांगितलं….

**होल्ड - बाईट - मयुर बोरकर**

थोड्याच वेळात निकाल जाहीर होतील.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांशी आज झालेल्या चकमकीत सात माओवादी ठार झाले. नारायणपूर जिल्ह्यातल्या दक्षिण अबोझमद भागात केंद्रीय राखीव पोलीस दल, विशेष तपास पथक आणि जिल्हा राखीव दल यांनी संयुक्तपणे राबवलेल्या शोध मोहिमेदरम्यान आज सकाळी ही चकमक झाली. या माओवाद्यांचे मृतदेह सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले असून परिसरात गोळीबार आणि शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

<><><><><>

फिडे बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत अटीतटीच्या लढतीनंतर भारताचा डी. गुकेश विश्वविजेता ठरला आहे. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतर बुद्धिबळाचा विश्वविजेता ठरलेला दुसरा भारतीय तर सर्वात कमी वयाचा पहिला बुद्धिबळपटू ठरला आहे.

त्याने त्याचा प्रतिस्पर्धी चीनचा ग्रँडमास्टर डिंग लिरेन याचा या १४ व्या फेरीअखेर पराभव केला. या अंतिम सामन्याच्या पहिल्या १३ फेऱ्या बरोबरीत सुटल्या होत्या.

या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुकेशचं अभिनंदन केलं. या यशामुळं जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत भारत एक शक्तिकेंद्र म्हणून उदयाला आला आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

देशाच्या किरकोळ किमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात घसरुन ५ पूर्णांक ४८ शतांश टक्क्यावर आला आहे. ऑक्टोबर महिन्यात हा दर ६ पूर्णांक २ दशांश टक्के इतका होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार, शहरी भागात हा दर ४ पूर्णांक ८३ दशांश टक्के, तर ग्रामीण भागात तो ५ पूर्णांक ९५ दशांश टक्के इतका आहे.

**<><><><><>**

जागतिक आयुर्वेद परिषद आणि आरोग्य एक्स्पो २०२४ चं उद्घाटन  आज उत्तराखंडमधल्या  डेहराडून इथं  उत्तराखंडचे  मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी  यांच्या हस्ते झालं.  ही आयुर्वेद परिषद जगभरातल्या तज्ज्ञ, संशोधक आणि अभ्यासकांना एकत्र आणून, प्राचीन उपचार परंपरा आणि आरोग्यसेवा उद्योगातल्या अत्याधुनिक नवकल्पनांमधे समन्वय साधण्याच्या दृष्टीनं महत्त्वाची ठरेल, असा विश्वास धामी यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या उत्तरप्रदेशातल्या संगम नगरी इथं भेट देणार आहेत. तसंच १३ जानेवारी २०२५ पासून सुरू होणाऱ्या महाकुंभ सोहळ्याचं औपचारिक उद्घाटन करणार आहेत. यावेळी ७ हजार कोटींच्या महाकुंभ प्रकल्पाचं उद्घाटनही प्रधानमंत्री करतील. यात दहा उड्डाणपूल, घाट आणि नदीकाठच्या रस्त्यांचा समावेश आहे. भारद्वाज आश्रम कॉरीडॉर, श्रींगवेरपूर धाम कॉरडॉर, अक्षव्यत कॉरीडॉर,  हनुमान मंदिर कॉरीडॉर यांचंही उद्घाटन  प्रधानमंत्री करणार आहेत.

**<><><><><>**

नेपाळचे लष्करप्रमुख जनरल अशोकराज सिग्देल यांनी आज नवी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली.  या भेटीत त्यांनी दोन्ही देशांशी संबंधित अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. नेपाळच्या  लष्कराची क्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षण, नियमित सराव, कार्यशाळा आणि चर्चासत्रांसह संरक्षण सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.  शेजारी प्रथम या भारताच्या धोरणाच्या अनुषंगाने आपल्या शेजारी राष्ट्राशी  संबंध दृढ करण्याच्या भारताच्या इच्छेचा त्यांनी पुनरुच्चार केला.